प्रकल्पग्रस्त दाखल्याचे एका वेळेस हस्तांतरण करण्यास परवानगी देणेबाबत.

महाराष्ट्र शासन.
महसूल व वन विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक- आरपीए २००७ /३/प्र.क्र.१३०/र-१,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- २६/३/ २००७.

शासन परिपत्रक :--

विविध प्रकल्पांमुळे बाधित होणाऱ्या व्यक्तींच्या पुनर्वसनाची कार्यवाही शासनाने निश्चित केलेल्या धोरणानुसार त्या व्यक्तीस उचित सुविधा / देय फायदे देवून करण्यात येते. पात्र प्रकल्पग्रस्त खातेदारास "प्रकल्पग्रस्त दाखला" देण्यात येतो. सदरहू दाखला त्या प्रकल्पग्रस्त खातेदाराने नामनिर्देशित केलेल्या त्यांच्या कुटुंबातील व्यक्तींच्या नांवे देण्यात येतो. सदरहू दाखल्याच्या त्यांच्या कुटुंबातील अन्य व्यक्तींच्या नावे हस्तांतरीत करण्याच्या अनुषंगाने या परिपत्रकान्वये असे आदेश देत आहे की, एकदा दिलेला प्रकल्पग्रस्त दाखला त्या प्रकल्पग्रस्त खातेदारांच्या कुटुंबातील अन्य व्यक्तींच्या नांवे फक्त एकदाच हस्तांतरीत करण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

( भा. र. गावित )
अवर सचिव
महसूल व वन विभाग

प्रत- सर्व विभागीय आयुक्त.
सर्व उप आयुक्त (पुनर्वसन) विभागीय आयुक्त यांचे कार्यालय
सर्व जिल्हाधिकारी.
सर्व जिल्हा पुनर्वसन अधिकारी.
सर्व कार्यासने. मदत व पुनर्वसन कक्ष, महसूल व वन विभाग
सर्व मंत्रालयीन विभाग
निवड नस्ती. र-१ कार्यासन. महसूल व वन विभाग. मंत्रालय.

जिल्हा पुनर्वसन कार्यालय, यवतमाळ.